# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 17 January 2025
## Time 01.00 to 01.05 PM
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक १७ जानेवारी २०२५ दुपारी १.०० वा.

****

मोबिलिटी क्षेत्रातलं अभूतपूर्व परिवर्तन आणि झपाट्याने होणाऱ्या प्रगतीमुळे विकसित भारताचा प्रवास अधिक जलद होईल, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीतील भारत मंडपम् इथं भारतातलं सर्वात मोठं परिवहन प्रदर्शन, भारत मोबिलिटी ग्लोबल एक्स्पो २०२५ चं उद्घाटन केल्यानंतर ते आज बोलत होते. भारत ग्रीन तंत्रज्ञान, इलेक्ट्रिक वाहनं, हायड्रोजन इंधन आणि जैवइंधनांच्या विकासावर भर देत असल्याचं त्यांनी सांगितलं. यावर्षी भारत मोबिलिटी ग्लोबल एक्स्पोने आणखी विस्तार साधला असून, देश वाहन उद्योगाच्या भविष्याकडे सकारात्मक पाऊल टाकत असल्याचं पंतप्रधान म्हणाले.

या एक्स्पोचं उद्दिष्ट संपूर्ण गतिशीलता मूल्य साखळीला एकाच छत्राखाली आणणं हे आहे. या वर्षीच्या प्रदर्शनात जागतिक महत्त्वावर विशेष भर दिला जाईल ज्यामध्ये जगभरातले प्रदर्शक आणि अभ्यागत सहभागी होतील.

****

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज राष्ट्रीय क्रिडा पुरस्कारांचं वितरण झालं. बुद्धिबळपटू डी गुकेश, हॉकीपटू हरमनप्रीत सिंग, पॅरा ॲथलिट प्रवीण कुमार आणि नेमबाज मनु भाकर यांना खेलरत्न पुरस्कारानं गौरवण्यात आलं. नेमबाज स्वप्निल कुसळे आणि पॅरा ॲथलिट सचिन खिलारी यांच्यासह ३५ जणांना अर्जुन पुरस्कारानं गौरवण्यात आलं. तर प्रशिक्षक सुभाष राणा, दीपाली देशपांडे, संदीप सांगवान यांना द्रोणाचार्य पुरस्कार प्रदान करण्यात आला.

ॲथलिट सुचा सिंह आणि पॅरा जलतरणपटू मुरलीकांत पेटकर यांना जीवनगौरव अर्जुन पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. तर खेलो इंडिया विद्यापीठ स्पर्धांमध्ये सर्वोच्च कामगिरी करणाऱ्या चंदीगढ विद्यापीठाला मौलाना अबुल कलाम आझाद चषक प्रदान करण्यात आला.

****

डिजीटल कौशल्य क्षेत्रात कॅनडा आणि जर्मनीला मागे टाकत भारतानं दुसऱ्या क्रमांकावर झेप घेतली आहे. क्यू एस वर्ल्ड फ्युचर स्किल्स इंडेक्सने हा अहवाल जारी केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी मोदी यांनी या कामगिरीबद्दल समाजमाध्यमावरील संदेशात आनंद व्यक्त केला. गेल्या दशकात सरकारने देशातल्या तरुणांना स्वावलंबी बनण्यास आणि रोजगार निर्मितीत सक्षम बनवणाऱ्या कौशल्यांनी सुसज्ज करण्याचं काम केलं आहे. देश समृद्धी आणि युवा सक्षमीकरणाच्या दिशेने प्रवास करत असताना हा अहवाल प्रसिद्ध होणं समाधानकारक असल्याचं पंतप्रधानांनी म्हटलं आहे.

****

दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आज शेवटचा दिवस आहे. आतापर्यंत ८४१ उमेदवारी अर्ज दाखल झाले. येत्या २० तारखेपर्यंत उमेदवार आपले अर्ज मागे घेऊ शकतात. दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी पाच फेब्रुवारीला मतदान होणार असून, आठ फेब्रुवारीला मतमोजणी होईल.

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या एमजीएम विद्यापीठाच्या शार्ङ्गदेव महोत्सवाला आजपासून प्रारंभ होत आहे. महागामीच्या वतीनं आयोजित या तीन दिवसीय महोत्सवात दररोज सायंकाळी सहा वाजता होणाऱ्या सादरीकरणात यंदा ज्योती हेगडे यांचं रुद्र वीणा वादन, दशावतार प्रयोग, सुखद मुंडे आणि समूहाचं पखावज वादन, प्रसिद्ध गायक भुवनेश कोमकली यांचं ख्याल गायन, आदी सादरीकरणांसह दररोज सकाळी दहा वाजता शार्ङ्गदेव प्रसंग या व्याख्यानमालेसह, शार्ङ्गदेव प्रवाह या कार्यशाळेचं आयोजन करण्यात आलं आहे. महोत्सवात शार्ङ्गदेव स्पंदन हे प्रदर्शनही पाहता येणार आहे. महोत्सवाचं हे १६ वं वर्ष आहे.

****

बीड जिल्ह्यात आष्टी तालुक्यातल्या वाहिरा परिसरात दोन सख्ख्या भावाची निर्घृण हत्या झाल्याचं उघडकीस आलं आहे. अजय आणि भरत भोसले हे आष्टी तालुक्यातल्या हातवळण या मूळ गावचे असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.  पोलिसांनी या प्रकरणी संशयित चार जणांना ताब्यात घेतलं असून, हत्येचं कारण अद्याप स्पष्ट झालं नसल्याचं सांगितलं आहे.

****

भंडारा जिल्ह्यातून जाणाऱ्या भंडारा – गडचिरोली समृद्धी महामार्गाला या परिसरातल्या शेतकऱ्यांनी विरोध केला आहे. या मार्गाच्या बांधकामाकरता जमिनीचं भूसंपादन करण्यासाठी अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली, मात्र राज्य सरकारने शेतकऱ्यांना विश्वासात न घेता ही अधिसूचना जारी केली असून, या निर्णयामुळे शेतकरी भूमिहीन होतील, अशा आशयाचं पत्र या शेतकऱ्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवलं आहे.

****

भारतीय खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत महिला एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत भारताच्या पी व्ही सिंधुचा सामना आज इंडोनेशियाच्या ग्रेगोरिया मारिस् टुनजुंग हिच्याशी होणार आहे. सिंधुनं काल झालेल्या सामन्यात जपानच्या मनामी सुईझू हिचा २१–१५, २१–१३ असा पराभव केला. याच स्पर्धेच्या पुरुष दुहेरीत भारताच्या सात्विकसाइराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी जोडीनेदेखील उपांत्यपूर्व फेरी गाठली आहे.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी परवा १९ तारखेला आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचा हा ११८ वा भाग असेल.

****